# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७७ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१६६५ : सोनोपंत डबिरांचे निधन.
१८७४ : चिपळूणकरांच्या निबंधमाला मासिकाचा प्रारंभ झाला.
१९७१ : हिमाचलला राज्याचा दर्जा देण्यात आला.
१९८२ : विनोभा भावे यांना भारतरत्न पदवी प्रदान.
१९८८ : पृथ्वी या क्षेपणास्त्राची चाचणी घेण्यात आली.

सेन्सेक्स ८१,५३७.७० -७६९.६६ (०.९४%)
डॉलर ₹ ९१.९१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १६ |
| दिल्ली | १८ | ०७ |
| मुंबई | ३१ | १८ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३० | ११ |

## सुविचार

शाळेत शिकलेलं प्रत्येक धडा आयुष्याचा पाया मजबूत करतो.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:१४

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५९,८९५/- ३,३५,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## थोडक्यात



### बनावट दिव्यांग ओळखपत्र वापरास एसटीकडून ब्रेक!

**यवतमाळ ।** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करताना दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या प्रवास सवलतीचा गैरवापर वाढला आहे. याला ब्रेक लावण्यासाठी महामंडळाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे व्यापक तपासणी मोहीम सुरू केली आहे. बनावट किंवा अवैध दिव्यांग ओळखपत्रांच्या आधारे सवलतीचा लाभ घेणे आता कठीण होणार आहे.

### आयसीसीचा बांगलादेशला दणका!


**दिल्ली ।** आयसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२६ च्या स्पर्धेला सुरुवात होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. अशात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने एक ऐतिहासिक आणि मोठा निर्णय घेतला आहे. सुरक्षेचे कारण पुढे करत भारतात येण्यास नकार देणाऱ्या बांगलादेशच्या संघाला वर्ल्ड कपमधून बाहेर करण्यात आले असून, त्यांच्या जागी आता स्कॉटलंडचा समावेश करण्यात आला आहे. आगामी टी-२० वर्ल्ड कपचे यजमानपद भारताकडे आहे. मात्र, बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आपल्या खेळाडूंना भारतात पाठवण्यास स्पष्ट नकार दिला होता. बांगलादेशची मागणी होती की, त्यांचे सामने भारताबाहेर आयोजित करावेत किंवा त्यांचा गट बदलावा. मात्र, आयसीसीने ही मागणी फेटाळून लावली. दोन्ही पक्षांमध्ये तडजोड न झाल्यामुळे अखेर आयसीसीने बांगलादेशला स्पर्धेतून बाद करून स्कॉटलंडला संधी दिली आहे.

### शशी थरूर नाराज? काँग्रेसच्या बैठकीकडे फिरवली पाठ

**तिरुवनंतपुरम ।** केरळच्या तिरुवनंतपुरमचे खासदार शशी थरूर व काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींत मतभेद असल्याची चर्चा काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात रंगली होती. जानेवारीच्या सुरुवातीला वायनाडमध्ये पार पडलेल्या काँग्रेसच्या दोन दिवसीय मंथन बैठकीत या चर्चेला पूर्णविराम मिळाला. त्यावेळी थरूर हे केरळमधील आपल्या काँग्रेसच्या सहकाऱ्यांशी निवांतपणे गप्पा मारताना दिसून आले. त्यासंदर्भातील छायाचित्र समोर आल्यानंतर त्यांचे पक्षाच्या राज्य नेतृत्वाबरोबरचे मतभेद मिटले असल्याचा कयास अनेकांनी बांधला. यादरम्यान घडलेल्या एका घडामोडीमुळे थरूर व काँग्रेसमधील मतभेद आणखीनच चव्हाट्यावर आल्याचे दिसून येत आहे.

# मुंबई महापौर पदाची निवड लांबणीवर?

## भाजप, शिंदेसेनेत रस्सीखेच सुरू



वृत्तसंस्था । मुंबई

**मुंबई महापालिकेचा महापौर कोण होणार याबाबत मोठी उत्सुकता आहे. २२ जानेवारीला मुंबई महापालिकेच्या महापौर पदाची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. या सोडतीत हे पद खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी राखीव झाले आहे. त्यानंतर भाजपकडून महापौर पदासाठी अनेक नावे आघाडीवर आहेत. या सगळ्यात आता महापौर पदाची निवड लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

पालिकेच्या निवडणुकीनंतर २७ जानेवारी रोजी महापौरपदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार होते. मात्र, भाजप आणि शिवसेना युतीबाबत एकत्रित गट स्थापन होणार की नाही याबाबत स्पष्टता नाही. यासोबतच पक्षाची गटनोंदणी पूर्ण झालेली नाही. या सगळ्या गोष्टी लक्षात घेता महापौर पदाची निवड फेब्रुवारी महिन्यात होणार असल्याची शक्यता आहे.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळाले. ८९ जागांवर भाजपने विजय मिळवला. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला केवळ २९ जागांवर विजय मिळवता आला. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी हॉटेल पॉलिटिक्सची रणनिती आखली. ज्याची बरीच चर्चा राजकीय वर्तुळात झाली. एकनाथ शिंदेंनी महापौर पदावर दावा केला असल्याची चर्चा झाली. यासोबतच स्थायी समिती अध्यक्षपदावर दावा केला आहे.

या पार्श्वभूमीवर भाजप आणि शिवसेना शिंदे यांच्यात जोरदार रस्सीखेच सुरू आहे. अंतर्गत चर्चा आणि वाद मिटल्याशिवाय स्पष्टता येणे अवघड आहे. त्यामुळे पक्षातील बड्या नेत्यांकडून तोडगा काढण्यावर भर दिला जात असल्याची माहिती आहे. दोन्ही पक्षांची गटनोंदणी पूर्ण झाल्यानंतरच महापौर निवड प्रक्रियेला गती मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे भाजपकडून महापौर पदासाठी अनेक नावे चर्चेत असून, जोरदार लॉबिंग सुरू झाले आहे. भाजप महापौर पद आपल्याकडे ठेवणार असून उपमहापौर पद शिंदेंच्या शिवसेनेला दिले जाणार असल्याची चर्चा आहे. महापौर पदाचा अंतिम निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार असल्याचे समजते.

**➢ तेजस्वी घोसाळकर, रितू तावडे, राजश्री शिरवडकर, अलका केरकर, हर्षिता नार्वेकर, रितू तावडे, आशा मराठे, शीतल गंभीर ही नावे महापौर पदाच्या रेसमध्ये आहेत. मात्र, भाजप पक्ष धक्कातंत्र देण्यासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे चर्चेत असलेल्या नावाला संधी मिळणार की अनपेक्षितपणे भाजप चर्चेत नसलेल्या नावाला संधी देणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.**

# अजित पवार महाविकास आघाडीत परतणार?

## • संजय राऊत यांचा खळबळजनक दावा

वृत्तसंस्था । मुंबई



**महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीचे संकेत मिळत असून, राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येतील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार पुन्हा महाविकास आघाडीत (मविआ) परततील, असा खळबळजनक दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांनी शनिवारी केला.**

अजित पवार सध्या महायुतीत असले तरी त्यांचे मन अजूनही त्यांच्या कुटुंबासोबत आणि पर्यायाने शरद पवारांच्या सोबतच आहे, असे राऊत यांनी यावेळी नमूद केले. मुंबईत पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांनी राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांवर भाष्य केले.

आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादींनी घड्याळ या चिन्हावर एकत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. याकडे लक्ष वेधत राऊत म्हणाले की, दोन्ही गट आता तांत्रिकदृष्ट्या एकत्र आले आहेत.

अजित पवार दोन दगडांवर पाय ठेवून चालू शकत नाहीत, त्यांना शेवटी आपल्या मूळ प्रवाहात म्हणजेच महाविकास आघाडीत यावेच लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी राऊत यांनी महायुतीमधील अंतर्गत कलहावरही बोट ठेवले.


**➢ बृहन्मुंबई महापालिकेच्या (बीएमसी) महापौरपदावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये तणाव असल्याचे त्यांनी सांगितले. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत भाजपला ८९ तर शिंदे यांच्या शिवसेनेला २९ जागा मिळाल्या आहेत. बहुमताचा आकडा गाठला असला तरी महापौरपदावरून रस्सीखेच सुरू आहे. दिल्लीतील भाजप नेतृत्व या पदाबाबत कोणतीही तडजोड करण्यास तयार नाही, त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे नाराज असल्याचे राऊत म्हणाले.**

# रशियाने ३७० ड्रोन, २१ क्षेपणास्त्रे डागली, युक्रेनचा ९०% भाग अंधारात

## अबू धाबीत शांतता वाटाघाटी सुरू असतानाच पुतिन यांचे मिसाईल राजकारण

वृत्तसंस्था । मॉस्को

**एकीकडे युद्धाच्या समाप्तीसाठी संयुक्त अरब अमिरातीमध्ये शांतता चर्चा सुरू असतानाच, रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हवाई हल्ला केला आहे.**



रशियाने रात्रभरात ३७० हून अधिक ड्रोन आणि २१ क्षेपणास्त्रे डागून युक्रेनची राजधानी कीव आणि खारकीव शहरांना लक्ष्य केले. या भीषण हल्ल्यामुळे युक्रेनमधील ऊर्जा यंत्रणा कोलमडली असून तब्बल ९० टक्के भागातील वीजपुरवठा खंडित झाला आहे.

अबू धाबी येथे रशिया, युक्रेन आणि अमेरिकेचे प्रतिनिधी चार वर्षांपासून सुरू असलेले युद्ध थांबवण्यासाठी दुसऱ्या दिवसाच्या चर्चेसाठी एकत्र आले होते. मात्र, याच काळात रशियाने केलेल्या हल्ल्यामुळे युक्रेनने तीव्र संताप व्यक्त केला आहे.

युक्रेनचे परराष्ट्र मंत्री अँड्रीय सिबिगा यांनी टीका करताना म्हटले की, पुतिन यांनी केवळ आमच्या शहरांवरच नाही, तर शांतता वाटाघाटीच्या टेबलावरच क्षेपणास्त्रे डागली आहेत. ही रशियाची क्रूरता आणि शांतता प्रक्रियेला कमकुवत(पान २ वर)

### पाच दिवसांचा आठवडा करा; मागणीसाठी सरकारी बँकेचे कर्मचारी जाणार संपावर

वृत्तसंस्था । मुंबई

कामकाजाचा आठवडा पाच दिवसाचा करावा आणि इतर मागण्यासाठी सरकारी बँक कर्मचार्यांच्या संघटनेने २७ जानेवारी रोजी संप करण्याचा निर्णय घेतला आहे. जर कर्मचार्यांनी खरोखरच २७ जानेवारी रोजी संप केला तर बँकांच्या कामकाजावर सलग तीन दिवस परिणाम होणार आहे. कारण २५ आणि २६ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी आहे. सार्वजनिक क्षेत्रातील सर्व बँकांनी आपल्या ग्राहकांना या संदर्भात माहिती दिली आहे. बँक कर्मचार्यांच्या संघटनांनी बुधवारी आणि गुरुवारी मुख्य कामगार आयुक्ताबरोबर यासंदर्भात चर्चा केली आहे.

# प्रजासत्ताक दिनापूर्वी दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला; ४ दहशतवाद्यांना अटक

वृत्तसंस्था । होशियारपूर

**पंजाबच्या होशियारपूरमध्ये पोलिसांनी पाकिस्तानच्या आयएसआय समर्थित संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार दहशतवाद्यांना अटक करण्यात आली आहे. यात २.५ किलो आरडीएक्सने भरलेले आयईडी देखील जप्त करण्यात आले आहे.**



प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांना लक्ष करून मोठा दहशतवादी हल्ला करण्यासाठी या आयईडीचा वापर केला जाणार होता, अशी माहिती प्राथमिक तपासातून समोर आली आहे. गुप्तचर माहितीच्या आधारे होशियारपूर पोलीस आणि सीआय जालंधरच्या पथकांनी ही संयुक्त कारवाई केली आहे. सोलापुरात जिल्हा परिषद निवडणुकीसाठी दोन्ही शिवसेना एकत्र, राजकीय वर्तुळात खळबळ याबाबत पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्यांची दिलजोत सिंह, हरमन सिंह उर्फ हॅरी, अजय उर्फ माहिरा आणि अर्शदीप सिंह उर्फ अर्श कंडोला अशी नावं आहेत.

हे सर्वजण एसबीएस नगर जिल्ह्यातील राहों भागातील रहिवासी आहेत. पोलिसांनी त्यांच्याकडून स्फोटकांव्यतिरिक्त दोन पिस्तूलही जप्त केली आहेत. पोलीस सध्या या चारही दहशतवाद्यांची कसून चौकशी करत असून (पान २ वर)

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये कर्करोग निदानाच्या तपासण्या मोफत

## कॅन्सर सदृश्य लक्षणं असलेल्या सर्वांनाच होणार लाभ; २५ हजारांपर्यंत अर्थसहाय्य

वृत्तसंस्था । नाशिक

**कर्करोगाचा (कॅन्सर) धोका सातत्याने वाढत असतानाच या आजारावरील सर्वात मोठा अडसर आजही लवकर निदानासाठी लागणारा खर्च ठरत असल्याचे दिसून येते. भारतात कर्करोगाची लक्षणे असलेल्या सुमारे ६० टक्क्यांहून अधिक रुग्णांकडे प्राथमिक तपासण्यांसाठी आवश्यक पैसे नसतात, तर महाराष्ट्रातही हीच परिस्थिती असून सुमारे ५५ ते ६० टक्के रुग्ण आर्थिक कारणांमुळे निदानास विलंब करत असल्याचे दिसून येते. परिणामी, अनेक रुग्ण तिसऱ्या किंवा चौथ्या टप्प्यात उपचारासाठी दाखल होतात. ही गंभीर बाब लक्षात घेऊन इगतपुरी तालुक्यातील नंदी हिल्स येथील एसएमबीटी हॉस्पिटलच्या कॅन्सर इन्स्टिट्युटमध्ये कर्करोग निदानासाठी लागणाऱ्या तपासण्या मोफत करण्यात आल्या आहेत.**

कर्करोग सदृश्य लक्षणे असलेल्या रुग्णांना २५ हजार रुपयांपर्यंतच्या तपासण्या पूर्णतः मोफत केल्या जात असून, या सुविधेचा लाभ आतापर्यंत हजारो रुग्णांनी घेतल्याची माहिती हॉस्पिटल प्रशासनाकडून देण्यात आली आहे. ही सेवा सोमवार ते शनिवार उपलब्ध आहे. रुग्ण थेट बाह्यरुग्ण विभागात किंवा आदिवासी व दुर्गम भागात आयोजित आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून प्राथमिक तपासणी करून हॉस्पिटलमध्ये या तपासण्यांसाठी लाभ घेत असल्याचेही सांगण्यात आले आहे.

मुंबईच्या प्रख्यात टाटा मेमोरियल हॉस्पिटलसोबत झालेला करार आणि याठिकाणी पूर्णवेळ उपलब्ध असलेले टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉक्टर्स यामुळे एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कर्करोग उपचार सुविधा ग्रामीण भागातच उपलब्ध झाल्या आहेत. एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये टाटा




मेमोरियलच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांची अनुभवी टीम कार्यरत आहे. यामध्ये मेडिकल ऑन्कोलॉजीसाठी डॉ. संदीप इशी, सर्जिकल ऑन्कोलॉजीसाठी डॉ. विनायक शेनगे व डॉ. अंबरीश चॅटर्जी, बालरोग कर्करोगासाठी डॉ. पिंकी शाह-काळे, तर हेमॅटो ऑन्कोलॉजीसाठी (ब्लड कॅन्सर) डॉ. गिरीश बदरखे सेवा देत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजवर हजारो रुग्णांवर यशस्वी उपचार व शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. या भागात कर्करोग निदानासाठी लागणाऱ्या रक्त तपासण्या, बायोप्सी, सीटी स्कॅन, एमआरआय अशा तपासण्यांचा खर्च अनेकांना परवडत नसल्याने निदान उशिरा होत होते. मात्र, एसएमबीटीच्या आरोग्य शिबिरांमधून आणि रुग्णालयातील मोफत तपासणी योजनेमुळे कर्करोगाची लक्षणे असलेले रुग्ण वेळेत शोधण्यात यश मिळत असून, त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करता येत आहेत.

याठिकाणी केवळ सामान्य कर्करोगच नव्हे, तर रक्तविकार कर्करोगांवर मायलोमा आणि ल्युकेमिया उपचार केले जात आहेत. खर्चिक मानल्या जाणाऱ्या बोन मॅरो ट्रान्सप्लांट शस्त्रक्रिया अल्पदरात केल्या जात (पान २ वर)

### ➢ लवकरच पेट स्कॅन व रेडीएशन थेरपी सुरु होणार

लवकरच एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये पेट स्कॅन आणि रेडिएशन थेरपी सुविधा सुरू होणार असून, त्यामुळे कर्करोग निदान अधिक अचूक आणि उपचार अधिक प्रभावी ठरणार आहेत. आम्ही लवकरच पेट स्कॅन व रेडिएशन थेरपी सुरू करत आहोत, ज्यामुळे रुग्णाला उपचारांसाठी बाहेर कुठेही जावे लागणार नाही. एसएमबीटी हॉस्पिटल हे सर्वसमावेशक कर्करोग केअर सेंटर म्हणून काम करेल.

**- सचिन बोरसे,**
सीओओ,
एसएमबीटी हॉस्पिटल

## संपादकीय

### मराठवाड्यात महिलांची लॉटरी

मागच्या आठवड्यात मकर संक्रांतीनिमित्त महिलांनी वाण लुटले. महिलांच्या याच आनंदाला पारावार उरलेला नसताना अशा परिस्थितीत मराठवाड्यात महापौरपदासाठी महिलाराज येणार. मराठवाड्यातील पाचपैकी तब्बल तीन जागांवर महिलाराज असणार आहे. गुरुवारी झालेल्या आरक्षण सोडतीचा हा निर्णय मराठवाड्यातील भावी महिला महापौरांच्या आनंदाला उधाण आणणारा आहे. मराठवाड्यात असलेल्या पाचपैकी तीन महानगरपालिकेत महापौरपदी विराजमान होण्याची संधी महिलांना मिळणार आहे. मराठवाड्यात सर्वाधिक महिला महापौर असणार आहेत. महिलांसाठी असलेली ही लॉटरीच म्हणावी लागणार आहे. नांदेड, जालना तसेच लातूर या तीन महानगरपालिकेत महिलांना महापौरपद सोडतीमध्ये सुटले आहे. महापालिकेतील महापौरपदाच्या आरक्षणासाठी गुरुवारी मंत्रालयात सोडत काढण्यात आली. महापौरपदाच्या पहिल्या अडीच वर्षांच्या कालावधीसाठी ही सोडत आहे. सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड व लातूर या पाच महानगरपालिकांपैकी तीन ठिकाणी महिला महापौर विराजमान होणार आहेत. नगर विकास खात्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी सकाळी मंत्रालयातील परिषद सभागृहात महापौरपदाची आरक्षण सोडत काढण्यात आली. महापौरपदाचे हे आरक्षण चक्राकार पद्धतीने काढण्यात आले. त्यामुळे या आधीचे संबंधित महापालिकेचे आरक्षण बाजूला ठेवण्यात आले. आरक्षणासाठी २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्यात आला आहे. पहिल्या अडीच वर्षांसाठी ही सोडत असणार आहे. मराठवाड्यातील पाच महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १५ जानेवारीला मतदान होऊन दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर झाले. पक्षीय बलाबल पाहता नांदेड, जालना व छत्रपती संभाजीनगर या तीन महापालिकेत महापौरपद भाजपकडे असणार आहे, तर परभणी महानगरपालिकेवर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचा महापौर होणार आहे. लातूरमध्ये काँग्रेस पक्षाला निर्विवाद यश मिळाल्याने मराठवाड्यातील लातूर महापालिकेवर काँग्रेसचा महापौर विराजमान होईल. नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे महापौरपद सर्वसाधारण महिलेसाठी सोडतीमध्ये निघाले आहे, तर जालना व लातूर या ठिकाणी देखील अनुसूचित जाती महिलेसाठी सोडत निघाली आहे. या तीन ठिकाणी महिला महापौर विराजमान होतील. अनेकदा महिला महापौर किंवा नगराध्यक्ष असल्या तरी त्या ठिकाणी त्यांचे पती किंवा रक्ताचे इतर नातलग त्या पदावर मस्वतः चीफ चालवत असतात. महिलांसाठी आरक्षित असलेल्या जागांचा कारभार खरोखर महिलांनी पाहावा, अशी अपेक्षा महिला वर्गातून व्यक्त केली जात आहे; परंतु प्रत्यक्षात महिलांच्या आरक्षणावर पुरुषांचाच कारभार असतो. असा अनेक ठिकाणचा अनुभव आहे. महिला व पुरुषांमध्ये भेदभाव नाही असे बोलण्यापुरते असले तरी प्रत्यक्षात मात्र चित्र वेगळेच असते. छत्रपती संभाजीनगर येथे प्रथमच भाजपचे निर्विवाद वर्चस्व सिद्ध झाले आहे. त्या ठिकाणी राज्याचे मंत्री अतुल सावे तसेच खासदार भागवत कराड व आमदार संजय केनेकर यांच्या मर्जीतला महापौर होईल.जालना येथेही भाजपचे आमदार कैलास गोरंट्याल तसेच माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या माध्यमातून महापौर निवडला जाईल. नांदेडमध्ये भाजपचा महापौर निवडत असताना राज्यसभा सदस्य अशोक चव्हाण यांच्या मर्जीतील नगरसेविकेला संधी मिळेल, तर परभणी येथे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार बंडू जाधव यांच्या मर्जीतील महापौर असणार आहेत.

# औद्योगिक क्षेत्राशी समन्वय साधून रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातील

## • जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचे आश्वासन

प्रतिनिधी । जळगाव

**आयटीआय प्रशिक्षणार्थ्यांना रोजगाराभिमुख कौशल्य प्राप्त होणे अत्यावश्यक असून औद्योगिक क्षेत्राशी समन्वय साधून अधिकाधिक रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जातील, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले या प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी घुगे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी आयएमसी अध्यक्ष जितेंद्रकुमार जैन, कौशल्य विकास व रोजगार विभागाचे उपायुक्त संदीप गायकवाड, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ.पी.पी. चौधरी उपस्थित होते.

यावेळी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पी.पी. चव्हाण यांनी जिल्ह्यातील सर्व प्रशिक्षणार्थ्यांच्या सहभागाचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एम.पी. सूर्यवंशी यांनी केले तर आभार संस्थेचे उपप्राचार्य नितीन चौधरी यांनी मानले. या प्रदर्शनाचे आयोजन व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पी.पी. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संस्थेचे प्राचार्य नवनीत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी संस्थेतील सर्व निदेशक, प्रशिक्षणार्थी तसेच सहकारी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## राष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धेत रोहित विसपुते यांना सिल्वर मेडल

प्रतिनिधी । पारोळा

**किसान महाविद्यालयाचा रायफल शूटिंग चा खेळाडू रोहित अशोक विसपुते याने गुजरात येथील गांधीनगर येथे आयोजित .२२ १०० मीटर या रायफल शूटिंग प्रकारात त्याला सिल्वर मेडल मिळाले, या स्पर्धा राष्ट्रीय स्तरावरील गांधीनगर, गुजरात येथे ५० मीटर व १०० मीटर रायफल शूटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.**



या स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतातील सुमारे २२७ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता त्यात किसान महाविद्यालयचा योगेश चौधरी हा देखील सहभागी झाला होता त्यापैकी रोहित विसपुते यांने २२ १०० मिटर या प्रकारात द्वितीय स्थान मिळवत घवघवीत यश संपादन केल्या बद्दल कि.वि.प्र. संस्थेचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष, माजी पालकमंत्री डॉ. सतीश पाटील , मा. जि.प.सदस्य रोहन पाटील यांनी त्याचे अभिनंदन केले आहे, प्राचार्य डॉ. वाय.व्ही. पाटील, उप प्राचार्य डॉ. जी. एच. सोनवणे डॉ. दिपक साळुंखे , डॉ. औजेकर अभिनंदन केले आहे, सदरील स्पर्धेसाठी खेळाडूंना क्रीडा संचालक डॉ. हर्ष सरदार यांचे मार्गदर्शन लाभले रोहित याचे अभिनंदन समस्त अहिर सुवर्णकार समाज बांधवांनी त्याचे कौतुक केले

## 'शावैम'मध्ये उद्या सीटी स्कॅन मशिनचा लोकार्पण सोहळा

प्रतिनिधी । जळगाव

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नव्याने दाखल झालेल्या अत्याधुनिक '१२८ स्लाईस कार्डियाक सीटी स्कॅन मशीन'चा लोकार्पण सोहळा सोमवार, दि.२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.**

या अत्याधुनिक सुविधेचे उद्घाटन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापनमंत्री गिरीश महाजन, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे यांच्यासह लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी व इतर अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या १२८ स्लाईस सीटी स्कॅन मशीनमुळे रुग्णांच्या निदानाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि अचूक होणार आहे. विशेषतः हृदयविकार, अपघात आणि गंभीर आजारांच्यावेळी तातडीने रिपोर्ट मिळण्यासाठी या मशिनचा मोठा फायदा होणार आहे. शासकीय रुग्णालयात ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे गरीब आणि गरजू रुग्णांना अत्यंत माफक दरात उच्च दर्जाची आरोग्य सेवा मिळणार आहे.

रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर, उप अधिष्ठाता तथा क्ष-किरण विभाग प्रमुख डॉ. मारोती पोटे यांनी या ऐतिहासिक सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. या सुविधेमुळे जळगावच्या आरोग्य क्षेत्रात एक मानाचा तुरा रोवला गेला असून, खाजगी रुग्णालयांच्या महागड्या चाचण्यांपासून सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## भारतीय बौद्ध महासभेची कार्यकारिणी जाहीर
## शहराध्यक्षपदी सुरेखा तायडे, सचिवपदी विलास खरात

प्रतिनिधी । भुसावळ

**भारतीय बौद्ध महासभेची बैठक नुकतीच भुसावळ येथे पार पडली. बैठकीत महासभेची भुसावळ शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात येवून यात शहराध्यक्षपदी सुरेखा तायडे तर सचिवपदी विलास खरात यांची निवड करण्यात आली.**

भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राजरत्न आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जळगाव जिल्हा कमिटीची बैठक नुकतीच भुसावळ येथील शासकीय विश्रामगृह येथे जिल्हाध्यक्षा प्रमिला किशोर भालेराव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. बैठकीत भुसावळ तालुकाध्यक्ष वासुदेव निळकंठ सुरवाडे यांच्या नेतृत्वात भुसावळ शहर कार्यकारिणी गठीत करुन जाहीर करण्यात आली.

याप्रसंगी जिल्हाध्यक्षा प्रमिला किशोर भालेराव, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत यशवंत निकम, जिल्हा कोषाध्यक्ष किशोर रामदास भालेराव, जिल्हा मीडिया समन्वयक मनिष शशिकांत साबळे, भुसावळ तालुका सचिव प्रमिला संजय गुरचळ, तालुका कोषाध्यक्ष किर्ती मनीष साबळे, तालुका मुख्य संघटक गौतम रामदास बोदडे, यावल तालुकाध्यक्ष किरण गोपाळ पांडव, यावल तालुका कोषाध्यक्ष संदिप भगवान तायडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्याहस्ते सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.




**■ यांचा आहे कार्यकारिणीत समावेश...**

कार्यकारिणीत सुरेखा सतीश तायडे (भुसावळ शहर अध्यक्ष), शीला सुनील तायडे (उपाध्यक्ष), विलास पांडुरंग खरात (सचिव), रूपाली गौतम सोनवणे (सहसचिव), समाधान सुपडू तायडे (कोषाध्यक्ष), वैशाली अनिल तायडे (सहकोषाध्यक्ष), शिल्पा विजयकुमार तायडे (मुख्य संघटक), रेखा किशोर पांडव (विहार समन्वयक), सरिता प्रदीप भालेराव (संस्कार समन्वयक), ज्योती प्रशांत सपकाळे (सदस्य), शालिनी राजू मोरे (सदस्य) आदींचा समावेश आहे.

## 'क्रीडा वेध' महोत्सवाचे आयएमआरमध्ये आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

के.सी.ई. सोसायटी संचलित इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च कॉलेजमध्ये दि.२२ ते २५ जानेवारीदरम्यान क्रीडावेध महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा.बी.व्ही. पवार यांच्याहस्ते झाले. या महोत्सवाअंतर्गत गुरुवार, दि.२२ रोजी सकाळी बुद्धिबळ व दुपारी कॅरम, शुक्रवार, दि.२३ रोजी क्रिकेट, बॅडमिंटन, कबड्डी तर दि.२४ रोजी टेबल टेनिस, संगीत खुर्ची, रस्सीखेच आदी स्पर्धा रंगल्या.

रविवार, दि.२५ रोजी फुटबॉल व व्हॉलीबॉल स्पर्धा होणार आहेत. प्रा.बी.व्ही. पवार यांनी, विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना 'शैक्षणिक प्रगतीसोबतच शारीरिक तंदुरुस्ती व मानसिक संतुलन राखण्यासाठी खेळांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने अभ्यासासोबत खेळांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा' असे आवाहन केले.

## पान १ वरुन

### प्रजासत्ताक दिनापूर्वी दहशतवादी......

त्यांच्या इतर साथीदारांचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, प्रजासत्ताक दिनापूर्वी मोठा दहशतवादी कट उधळण्यास पंजाब पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. कठुआमध्ये चकमकीत जैश ए मोहम्मद संघटनेचा दहशतवादी ठार - दुसरीकडे, जम्मू-काश्मीरच्या कठुआमध्ये चकमकीत जैश ए मोहम्मद या संघटनेच्या एका दहशतवाद्याला ठार करण्यात आलं. बिलावर परिसरात संयुक्त मोहीम राबवण्यात आली. सुरक्षा दलाच्या जवानांनी केलेल्या कारवाईत एक दहशतवादी मारला गेला, अशी माहिती जम्मू रेंजचे पोलीस महानिरीक्षक भीम सेन टुटी यांनी दिली. उस्मान असे मारल्या गेलेल्या दहशतवाद्याचं नाव असून, तो जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा कमांडर आहे. त्याच्याकडील एम फोर स्वयंचलित रायफलसह मोठ्या प्रमाणात शस्त्र आणि स्फोटकं हस्तगत करण्यात आली आहेत.

### एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये......

असून, आधुनिक उपचारपद्धतींपैकी एक असलेली कार-टी सेल थेरपी देखील येथे अल्पदरात उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधा स्थानिक पातळीवर मिळाल्याने रुग्णांची मोठी गैरसोय टळली आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना मोफत व अल्पदरात दर्जेदार कर्करोग उपचार उपलब्ध करून देत, एसएमबीटी हॉस्पिटलने वैद्यकीय क्षेत्रात एक विश्वासार्ह आणि दिलासादायक केंद्र म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. विशेषतः कर्करोग सदृश्य लक्षणे असलेल्या रुग्णांसाठी २५ हजार रुपयांपर्यंतच्या तपासण्या मोफत करून, लवकर निदान आणि वेळेत उपचाराचा मार्ग खुला केला आहे. लवकर निदान झालेला कुठलाही कर्करोग बरा होतो यासाठी हॉस्पिटल प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. विशेष म्हणजे २६ पेक्षा अधिक सुपर स्पेशालिटी आणि स्पेशालिटी सेवा एकाच छताखाली कार्यरत आहेत, तब्बल २०० पेक्षा अधिक बेड्सचा आयसीयू बॅकअप,१७ अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर्स, सुसज्ज एमआरआय, एक्स-रे, पॅथॉलॉजी सुविधा तसेच २४ तास तज्ज्ञ इंटेन्सिव्हिस्ट सेवा येथे उपलब्ध आहेत. त्यामुळे सर्व प्रकारच्या आजारांवर एकाच ठिकाणी उपचार करणे शक्य झाले आहे.

### रशियाने ३७० ड्रोन......

करण्याची चाल आहे. मुख्य शहरे ठरली लक्ष्य; जनजीवन विस्कळीत- कीव आणि खारकीव: रशियन हल्ल्याचा मुख्य केंद्रबिंदू राजधानी कीव आणि दुसरे मोठे शहर खारकीव होते. कीवमधील अनेक जिल्ह्यांत ड्रोन हल्ल्यांमुळे भीषण आग लागली. अंधारात बुडाले युक्रेन: ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य केल्यामुळे युक्रेनमधील सुमारे ८८,००० हून अधिक कुटुंबांना तात्काळ वीज कपातीचा सामना करावा लागला. कडाक्याच्या थंडीत लाखो नागरिक अंधारात असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. जखमींची संख्या: या हल्ल्यात आतापर्यंत १३ जण गंभीर जखमी झाले असून, मृतांचा अधिकृत आकडा अद्याप समोर आलेला नाही. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर जेलेंस्की यांनी या हल्ल्याचा निषेध करताना सांगितले की, गेल्या काही आठवड्यांतील हा सर्वात मोठा हवाई हल्ला आहे. यावरून रशियाची युद्ध थांबवण्याची कोणतीही मानसिकता नसल्याचे स्पष्ट होत आहे. दरम्यान, युक्रेनचे संरक्षण मंत्री रुस्तम उमेरोव अबू धाबीत चर्चेसाठी उपस्थित आहेत, मात्र डोनबास प्रदेशातील सीमावादावर अद्याप कोणताही तोडगा निघू शकलेला नाही. तिसऱ्या महायुद्धाची भीती?- रशियाने चर्चेच्या दरम्यानच इतक्या मोठ्या प्रमाणावर केलेल्या हल्ल्यामुळे जागतिक स्तरावर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. नाटो आणि पाश्चात्य देश यावर काय भूमिका घेतात, याकडे जगाचे लक्ष लागले आहे. रशियाची ही आक्रमकता शांतता प्रक्रियेला पूर्णपणे खिळ घालणारी ठरल्यास युद्धाचा भडका अधिक उडू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## धरणगावात बाळासाहेब ठाकरे यांची शताब्दी जयंती साजरी

प्रतिनिधी । धरणगाव

**येथे शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या शताब्दी जयंतीनिमित्त शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसरात शिवसैनिकांमध्ये जोश, एकजूट आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.**




कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष सोनवणे यांनी केले. जयंतीनिमित्त नगराध्यक्षा लीलाताई चौधरी, माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, विधानसभा प्रमुख रमेश पाटील, तालुका प्रमुख जयदीप पाटील, ज्येष्ठ नेते जानकीराम पाटील, राजेंद्र ठाकरे, सुनील कापूरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास माल्यार्पण करून अभिवादन केले. त्यानंतर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी नगराध्यक्षा लीलाताई चौधरी यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेचा गौरव करत त्यांच्या संघटनात्मक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यावर प्रकाश टाकला. शिवसेनेची मूळ भूमिका, सर्वसामान्य जनतेशी असलेली नाळ आणि पक्षाची लढाऊ भूमिका अधिक बळकट करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या जयंती सोहळ्यास नगरसेवक निलेश चौधरी, भागवत चौधरी, परमेश्वर महाजन, लक्ष्मण माळी, सुनील चौधरी, नगरसेविका हेमांगी अग्निहोत्री, ज्योती पाटील, प्रमिला शिरसाठ, भारती महाजन, माजी नगरसेवक जितेंद्र धनगर, किरण मराठे, कृपाराम महाजन, सुनील जावरे, भीमराज धनगर, किरण अग्निहोत्री, विनोद रोकडे, सुनील चव्हाण, शुभम माळी, राजेंद्र ठाकूर, राहुल रोकडे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात शिवसैनिकांमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद आणि एकजुटीचे दर्शन घडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश चव्हाण यांनी केले, तर आभार रणजीत शिकरवार यांनी मानले.

## विद्यापीठात क्रीडा स्पर्धांचे आयोजन

प्रतिनिधी । धरणगाव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिसरातील विविध प्रशाळांच्या संयुक्त विद्यमाने क्रिकेट, बॅडमिंटन, बुद्धिबळ तसेच ४०० मीटर धावणे अशा विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये २०६ मुले आणि १३७ मुलींचा समावेश आहे. या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन विद्यापीठाचे प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. दिनेश पाटील, अधिसभा सदस्य डॉ. विशाल पराते, प्रा. दीपक दलाल, प्रा. किशोर पवार, अमर हटकर आदी उपस्थित होते.

# पालकांनी पाल्यांसाठी साकारले ढोलकी, तुणतुणे आणि टोप

## • पोदार प्रेपमध्ये आयोजित प्रॉप-मेकिंग पार्टी व प्रदर्शनाला लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । जळगाव

**पोदार प्रेपमध्ये शुक्रवार दि.३० रोजी वार्षिक स्नेहसंमेलनचे आयोजन करण्यात आले असून या स्नेहसंमेलनाच्या तयारीला वेग आला आहे. तयारीचा एक भाग म्हणून नुकतेच शाळेच्या आवारात भव्य प्रॉप-मेकिंग पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यात पालकांनी मोठ्या उत्साहाने सहभागी होत स्नेहसंमेलनात रंगभुमीवर बालकलाकारांना सादरीकरणासाठी लागणारे ढोलकी, तुणतुणे, टोप, बासरी यांसारख्या वस्तु साकारल्या.**





यावेळी पालक, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन केलेले हे सहकार्य स्नेहसंमेलनाच्या तयारीसोबतच सुंदर आठवण निर्माण करणारे ठरले. दरम्यान, याचवेळी प्रदर्शनचे देखील आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनामध्ये पालकांनी वार्षिक स्नेहसंमेलनापूर्वीच्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. 'जंबो के साथ सुर और साज का संगम' या संकल्पनेवर आधारित प्रदर्शनात भारतातील विविध राज्यांमधील पारंपरिक वाद्ये, त्यांचे वैशिष्ट्य आणि सांस्कृतिक महत्त्व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेल्स व उपक्रमांद्वारे सादर करण्यात आले. राज्यनिहाय भारतीय वाद्यांवर आधारित या उपक्रमांचे सादरीकरण पाहून पालकांनी शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीचे मनापासून कौतुक केले.

कार्यक्रमास प्राचार्य गोकुळ महाजन व मुख्याध्यापिका उमा पाटील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण पोदार प्रेप परिवाराने परिश्रम घेतले.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**※ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (※ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# धुळीमुळे पिके धोक्यात आल्याने शेतकऱ्यांचा वाहने अडवून रास्ता रोको

## पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनावर परिणाम होत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार

प्रतिनिधी । बोराडी

**बोराडी-वाघाडी रस्त्याचे काम गेल्या सहा महिन्यांपासून रखडल्याने परिसरातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. रस्त्याच्या कामासाठी वापरली जाणारी अवजड वाहने आणि उडणाऱ्या धुळीमुळे शेतातील पिकांचे मोठे नुकसान होत आहे. या त्रासाला कंटाळून संतप्त शेतकऱ्यांनी पहाटे काम करणारी वाहने अडवून धरली, ज्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**





गेल्या सहा महिन्यांहून अधिक काळापासून या रस्त्याचे काम संथ गतीने सुरू आहे. या दरम्यान कामासाठी वापरली जाणारी अवजड यंत्रसामग्री आणि डंपर यांची सतत वर्दळ असते. या वाहनांमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडते. ही धूळ लगतच्या शेतात साचल्याने पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनावर मोठा परिणाम होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. वारंवार सूचना देऊनही संबंधित ठेकेदार किंवा प्रशासनाकडून धुळीचा बंदोबस्त करण्यासाठी पाणी मारले जात नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. अखेर ९ वाजेच्या सुमारास परिसरातील शेतकऱ्यांनी एकत्र येत रस्त्याचे काम करणारी वाहने अडवली. यामुळे रस्त्याचे काम पूर्णपणे ठप्प झाले.

वाहने अडवल्यामुळे घटनास्थळी काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र, प्रशासकीय प्रतिनिधी आणि ठेकेदाराने चर्चेतून मार्ग काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांचा रोष काहीसा कमी झाला. रस्ता लवकरात लवकर पूर्ण करावा आणि कामादरम्यान पिकांचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याप्रसंगी . गोपाळ न्हावी, सतीश पाटील, राकेश माळी, मुन्ना गोसावी, पिंटू माळी, विनोद कोळी, डी. एम. पाटील यांच्यासह मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.

> **➤ तोपर्यंत आम्ही वाहने पुढे जाऊ देणार नाही**
>
> रस्त्याच्या कामाला आमचा विरोध नाही, पण धुळीमुळे हातचे पीक जात आहे. जोपर्यंत धूळ थांबवण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या जात नाहीत, तोपर्यंत आम्ही वाहने पुढे जाऊ देणार नाही.
>
> **– विनोद कोळी,** शेतकरी

# भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन समारंभ

प्रतिनिधी । धुळे

**भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभसोमवार, दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ठिक ९.१५ वाजता पोलीस कवायत मैदान, धुळे येथे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल यांचे हस्ते होणार आहे. अशी माहिती जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिली आहे.**

भारतीय ७७ वा प्रजासत्ताक दिन समारंभाचा मुख्य शासकीय ध्वजवंदनाचा कार्यक्रम २६ जानेवारी २०२६ रोजी राज्यभर एकाचवेळी सकाळी ९.१५ वाजता करण्यात येणार असल्याने या दिवशी सकाळी ८.३० ते १० च्या दरम्यान ध्वजवंदनाचा किंवा इतर कोणताही शासकीय किंवा अर्धशासकीय समारंभआयोजित करण्यात येऊ नये. एखाद्या कार्यालयास अथवा संस्थेला आपला स्वतःचा ध्वजारोहण समारंभ करावयाचा असल्यास त्यांनी तो समारंभ सकाळी ८.३० च्या पुर्वी किंवा १० वाजेनंतर करावा. पोलीस मुख्यालय येथील ध्वजवंदनाचा मुख्य शासकीय समारंभास स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, नगरसेवक, स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवानांच्या पत्नी व आई-वडील, शौर्य पुरस्कार विजेते, स्थानिक राजकीय पक्षांचे प्रमुख, आणीबाणीच्या कालावधीत कारावास भोगलेल्या व्यक्ती, शासकीय अधिकारी आणि नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहनही जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले आहे.

## थोडक्यात

### बोराडी-सामऱ्यापाडा रस्त्याचा बोजवारा

**शिरपूर ।** बोराडी-सामऱ्यापाडा रस्त्याच्या कामात ठेकेदाराच्या मनमानीमुळे स्थानिक नागरिकांचा संताप उफाळला आहे. गेले पंधरा ते वीस दिवस या रस्त्याचे खडीकरण सुरू आहे. या कामाबाबत वारंवार तक्रारी केल्या गेल्या, तरी संबंधित अधिकारी तक्रारींकडे दुर्लक्ष करत आहेत. परिणामी, रस्त्याची खडी उखडायला सुरुवात झाली आहे, ज्यामुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या कामात ५० एमएमचा बीबीएम (ब्लॉक बेस मटेरियल) करण्यास बांधील असताना, ठेकेदाराने त्यासाठी निकृष्ट दर्जाचे आणि कमी एमएमचे खडे वापरले आहेत. यामुळे रस्ता सपाट न राहता उखडून गेला आहे.

### नगाव ग्रा.पं.ला अभिनेत्री सोनाली कुलकर्णींची भेट

**धुळे ।** महाराष्ट्र शासनाच्या ममुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानालाफ गती देण्यासाठी आणि ग्रामीण विकासातील लोकसहभाग वाढविण्यासाठी नगाव ग्रामपंचायतीला अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांनी भेट दिली, अशी माहिती पंचायत समितीच्या माजी सभापती तथा लोकनियुक्त सरपंच ज्ञानज्योती भदाणे यांनी दिली. ग्रामपंचायतीने अभिनेत्री कुलकर्णी यांचे विशेष स्वागत करून सत्कार केला. ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात उपसरपंच रेखा अहिरे यांनी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांचे सत्कार करून सन्मान केला.

### नंदुरबार येथे मराज्य क्रीडादिन साजरा

**नंदुरबार ।** ऑलिम्पिक पदक विजेते दिवंगत खाशाबा जाधव यांच्या जयंतीनिमित्त १५ जानेवारी हा दिवस मराज्य क्रीडा दिन म्हणून जिल्हा क्रीडा संकुल नदुरबार येथे उत्साहात साजरा करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे. खाशाबा जाधव यांनी १९५२ मध्ये हेलसिंकी येथे झालेल्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेत कुस्ती क्रीडा प्रकारात पहिले वैयक्तिक कांस्यपदक पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात कामगिरी केली होती. त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगीरी राज्याचा बहुमान व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी १५ जानेवारी रोजी नंदुरबार येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे राज्य क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या औचित्याने हॉकी क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन शासकीय निवासी इंग्रजी माध्यमाच्या आश्रमशाळेच्या प्राचार्या ज्योती निरभवने यांच्या हस्ते झाले.

# कर्मयोगी गाडगेबाबा प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाला प्रतिसाद

प्रतिनिधी । धुळे

**महाराष्ट्र ही संतांची पुण्यभूमी आहे. अशा या पुण्यभूमीत अनेक संत-महात्मे होऊन गेले. त्यातीलच एक महान संत म्हणजे राष्ट्रसंत गाडगेबाबा, सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने सांस्कृतिक कार्य मंत्री, ॲड. आशिष शेलार यांच्या अभिनव कल्पनेतून व सचिव सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्य शासनाच्या वतीने हिरे भवन येथे कर्मयोगी गाडगेबाबा या प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

या सांस्कृतिक कार्यक्रमाचा शुभारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक संघाचे मुख्य समन्वयक ॲड. एन. एस. पाटील यांच्या हस्ते गाडगेबाबा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. रजंनी मुगंसे, निवृत न्यायधिश जे. टी. देसले, अतुल निकम, जिल्हा क्रीडा अधिकारी एम. के. पाटील, आप्पा खताळ, तमाशा परिषदेचे अध्यक्ष शेषराव गोपाळ, कलावंत विकास मंचचे जिल्हाध्यक्ष सुरेश चत्रे ज्येष्ठ नागरीक संघांचे उपाध्यक्ष अरविंद पाखले, एन.पी. वाणी, परिट धोबी समाज संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष कृष्णा शिंदे, दिलीप गवळी, परदेशी धोबी संघटनेचे अध्यक्ष गणेश परदेशी, संत गाडगे बाबा सांस्कृतिक मंडळाचे गायकवाड , अध्यक्ष अमोल आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक विनोद ढगे यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे स्वागत ज्येष्ठ संयोजक विजय मंगळे यांनी केले. या कार्यक्रमात युवा भारूडकार हम्मीद सय्यद (अहिल्यानगर) यांचा भारूडाचा कार्यक्रम व अमरावती येथील प्रसिद्ध प्रबोधनकार व सप्तखंजीरी वादक पवन महाराज दवंडे यांचा प्रबोधनात्मक असा कर्मयोगी गाडगे महाराज या सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमास धुळेकरांच्या उदंड प्रतिसाद मिळाला. गोपाला गोपला देवकी नंदन गोपालाच्या गजरात संपूर्ण हिरे भवन भारूडाच्या रंगी रंगुन गेले. या प्रसंगी धुळ्यातील ज्येष्ठ नागरिक संघ, परिट धोबी महासंघ, अखिल भारतीय शाहीर परिषद, अखिल भारतीय नाट्य परिषर, खान्देश तमाशा परिषद, बालरंगभूमी परिषद, धुळे ऑर्केष्ट्रा कलाकार संघ आदी विविध संस्थांचे कलावंत लोककलावंत मोठ्या संस्थेने उपस्थित होते.

कार्यक्रच्या यशस्वीतेसाठी समन्वय सिध्दांत मगळे, मोहीत पाटील, सचिन महाजन, राहूल मंडळे, अरविंद पाटील यांनी परिश्रम घेतले.

## देवपुरातील महिलेची सोनपोत लांबवली

प्रतिनिधी । धुळे

बसमध्ये चढत असताना एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी चोराने लांबवल्याची घटना साक्री बसस्थानकात घडली आहे. वैशाली बोरसे या मंगळवारी साक्री बसस्थानकावर धुळ्याकडे जाण्यासाठी थांबल्या होत्या. काही वेळात सुरत-धुळे ही बस स्थानकात आली. बसमध्ये चढताना चोराने त्यांच्या गळ्यातील सुमारे ४१ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत चोरून नेली.

# खान्देश सावली कला महोत्सवाचे आज आयोजन

प्रतिनिधी । धुळे

खानदेशातील महिला व पुरुष कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे तसेच दुर्गम भागातील सांस्कृतिक क्षेत्रातील कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळावी व खानदेशाची लोककलेची परंपरा टिकून रहावी यासाठी खानदेश सावली लोककला महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात येत आहे. या बैठकीत शाहीर लोककलावंत, भजनी मंडळी, ऑर्केस्ट्रा क्षेत्रातील कलावंत, नाट्य कलावंत, तमाशा क्षेत्रातील कलावंत तसेच लोककला जोपासणारी मंडळी आदींनी उपस्थित रहावे. सदर बैठक दि.२५ रविवार रोजी दुपारी ४ वाजता, बर्वे स्मृती अग्रसेन लॉन्स जवळ धुळे, येथे खानदेश सावली लोककला महोत्सव संबंधीचे विविध प्रकारच्या कमिटी गठीत करण्यासाठी व आयोजना संबंधी चर्चा करण्यासाठी महत्वपूर्ण बैठक बोलवण्यात आली असून लोक कलेवर प्रेम करणारे सांस्कृतिक क्षेत्रातील सर्वच कलाकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अखिल भारतीय मराठी शाहीर परिषदेचे आप्पा खताळ, कवी जगदीश देवपूरकर, कलावंत विकास मंचचे जिल्हाध्यक्ष सुरेश चत्रे, महाराष्ट्र तमाशा कलावंत परिषदचे अध्यक्ष शेषराव गोपाळ, शाहीर गंभीर बोरसे, कलावंत परिषदेचे महिला संघटक मंडाताई माळी, खानदेश वारकरी शाहीर परिषदचे अध्यक्ष अनिल जगताप, शाहीर श्रावण वाणी, शांताराम माळी आदींनी केले आहे.

# गो-तस्करी व हत्याप्रकरणी २६ रोजी हिंदू समाजचा उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूरमध्ये गो-तस्करी व गौहत्या प्रकरणी सकल हिंदू समाज आक्रमक झाला असून २६ जानेवारीला उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.**

याबाबत नगरपरिषदेला निवेदन देण्यात आले आहे. शहरातील काही भागांमध्ये गौ तस्करी व गौहत्या होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असून या गंभीर प्रकरणी सकल हिंदू समाज नवापूर यांच्यावतीने नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. संबंधित प्रकरणांवर तात्काळ व कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, नवापूर शहरातील इस्लामपुरा, कसाईवाडा, पाडवी ग्राउंड व गडी परिसरात गौ-तस्करी व गौहत्या होत असल्याबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी येत आहेत. या प्रकारांमुळे सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, कायदा-सुव्यवस्था तसेच सामाजिक सलोखा धोक्यात येत असून, शहरातील शांततेला बाधा निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५, कत्तलखाने व मांस विक्री नियम तसेच महाराष्ट्र राज्य गौहत्या प्रतिबंधक कायदा २०१५ यांचा उल्लेख करत, शहरातील कत्तलखाने व मांस विक्री केंद्रांवर नियंत्रण ठेवणे ही नगरपरिषदेची कायदेशीर जबाबदारी असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. सकल हिंदू समाजाने नगरपरिषदेकडे शहरातील मांस विक्री परवाने व कत्तलखान्यांची तात्काळ तपासणी करावी, बेकायदेशीर कत्तल किंवा मांस विक्री आढळल्यास संबंधितांचे परवाने रद्द करून दंडात्मक कारवाई करावी, तसेच पोलीस व महसूल प्रशासनाशी समन्वय साधून संयुक्त कारवाई राबवावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, या मागण्यांची प्रशासनाने दखल न घेतल्यास दि.२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी सकल हिंदू समाज नवापूर यांच्यावतीने शांततामय व अहिंसक उपोषण करण्यात येणार असल्याची पूर्वसूचनाही नगरपरिषदेला देण्यात आली आहे.

# नगरपालिकेच्या विषय समित्यांच्या सभापतींची सर्वानुमते निवड

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूर नगरपरिषदेच्या विविध विषय समित्यांच्या सभापती पदांसाठी नगरपरिषद कार्यालयातील वीर एकलव्य सभागृहात विशेष बैठक घेण्यात आली. ही बैठक पिठासीन अधिकारी तहसीलदार दत्तात्रय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.**

या बैठकीस प्रभारी मुख्याधिकारी हर्षल सोनवणे, नगराध्यक्ष जयवंत जाधव, उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे, प्रशासकीय अधिकारी प्रियंका आव्हाड तसेच सर्व नगरसेवक उपस्थित होते. सभापतींची निवड प्रक्रिया शांत, खेळीमेळीच्या व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली. नवनियुक्त सभापती सर्वानुमते खालीलप्रमाणे निवड करण्यात आली बांधकाम समिती : भालचंद्र केवजी गावीत, आरोग्य समिती : मिनल अमृत लोहार, पाणीपुरवठा समिती: शरद गुलाबराव पाटील, महिला व बालविकास समिती : सभापती - सुरैय्या फारुख शाह उपसभापती -मनिषा पुण्या मावची नियोजन व विकास समिती : उपनगराध्यक्ष नरेंद्र नगराळे सर्व सभापतींची निवड कोणत्याही विरोधाशिवाय करण्यात आली. यावेळी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांनी नवनियुक्त सभापतींचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी पिठासीन अधिकारी तहसीलदार दत्तात्रय जाधव, मुख्याधिकारी हर्षल सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) भरत गावीत तसेच युवा उद्योजक धनंजय गावीत यांनीही शुभेच्छा व्यक्त केल्या. विषय समिती सभेला सकाळी ११ वाजता सुरुवात झाली होती. नगरविकास, नागरिक सुविधा व शहराच्या प्रगतीसाठी या समित्या महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला. सभा यशस्वी करण्यासाठी वरिष्ठ लिपिक अशोक साबळे, पवन वळवी आदी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या निवडीमुळे नवापूर नगरपरिषदेच्या कामकाजाला नवचैतन्य मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. नव्याने निवडून आलेले सभापती शहराच्या विकासासाठी तसेच नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी प्रभावीपणे काम करतील, असा विश्वास नवापूरकरांनी व्यक्त केला आहे.

# सिकलसेल मुक्तीसाठी १५ फेब्रुवारीपर्यंत अरुणोदय मोहीम

प्रतिनिधी । साक्री


**धुळे जिल्ह्यात सिकलसेल आजाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता, जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभागाने या आजाराला मुळापासून संपवण्यासाठी अरुणोदय ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. दहिवेल (ता. साक्री) सह संपूर्ण जिल्ह्यात १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत ही मोहीम राबवण्यात येत आहे.**

हा आजार अनुवांशिक असल्याने त्याची साखळी तोडण्यासाठी मविवाहपूर्व तपासणीफ अनिवार्य असल्याचे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ. हितेंद्र गायकवाड यांनी केले आहे. सिकलसेल हा केवळ रक्ततपासणीद्वारेच ओळखता येतो, त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, दहिवेल प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश मोहन गवळी यांनी माहिती दिली की, दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत पोहोचून तपासणी, निदान आणि मोफत उपचार करण्यावर भर दिला जात आहे. ताप, सांधेदुखी किंवा अशक्तपणा जाणवल्यास त्वरित तपासणी करण्याचे आवाहन केले आहे. दहिवेल केंद्रातील आरोग्य सेवक ए.पी. नेटके, आरोग्य सेविका सी.सी. साबळे आणि आशा स्वयंसेविका घरोघरी जाऊन रुग्णांना पुरेसे पाणी पिणे व पौष्टिक आहार घेण्याचा सल्ला देत आहेत. योग्य काळजी घेतल्यास सिकलसेल रुग्णही सामान्य आयुष्य जगू शकतात, असा विश्वास आरोग्य पथकाने व्यक्त केला आहे.

# बालकांमधील सुप्त गुणांना वाव देणारा मंच कौतुकास्पद : न्यायाधीश कुलकर्णी

प्रतिनिधी । धुळे

**बालकांमधील कला-कौशल्ये, सुप्त गुण तसेच खेळ भावना विकसित होण्यासाठी आयोजकांनी उपलब्ध करून दिलेला मंच अत्यंत महत्त्वाचा व कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे न्यायाधीश तथा सचिव प्रविण कुलकर्णी यांनी केले.**



महिला व बाल विकास विभागांतर्गत काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या तसेच संस्थेबाहेरील बालकांसाठी आयोजित चाचा नेहरू बाल महोत्सव २०२५ अंतर्गत क्रीडा, चित्रकला व विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण व समारोप समारंभ सकाळी जिल्हा क्रीडा संकुल, धुळे येथे न्यायाधीश कुलकर्णी यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी राजेंद्र भामरे, जिल्हा परिविक्षा अधिकारी गिरीष जाधव, बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. उषा साळुंखे, सदस्या ॲड. अनिता भांबरे, सुरेखा पवार, राजेश्री ठाकुर, सतीश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. न्यायाधीश कुलकर्णी यांनी स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या सर्व बालकांचे अभिनंदन केले. तसेच, ज्यांना पारितोषिक मिळाले नाही त्यांनी निराश न होता खेळ भावनेने पुढील स्पर्धांसाठी तयारी करावी, असे आवाहन केले. यावेळी बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा डॉ. उषा साळुंखे, सदस्या ॲड. अनिता भांबरे व सुरेखा पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी चित्रकला, उंच उडी, लांब उडी, १०० मीटर धावणे, बुद्धिबळ, कबड्डी, फॅन्सी ड्रेस, वैयक्तिक नृत्य (मुले-मुली), सांघिक नृत्य आदी स्पर्धांमधील प्रथम, द्वितीय व तृतीय विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. यावेळी जयहिंद महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रास्ताविक गिरीष जाधव यांनी केले. सूत्रसंचालन पूनम बेडसे व माधवी तेले यांनी तर आभार अर्चना पाटील यांनी मानले. यावेळी यमुनाई शैक्षणिक व सांस्कृतिक महिला संस्थेचे सुनिल वाघ, साई प्रतिष्ठानचे शरद पाटील, सुनिल परदेशी, सप्तश्रृंगी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या मीना भोसले आदी उपस्थित होते.

## ३० जानेवारीला पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

प्रतिनिधी । नंदुरबार

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित महाराज ज.पो. वळवी कला, वाणिज्य आणि वि.कृ.कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय, धडगांव यांच्या संयुक्त विद्यमाने ३० रोजी सकाळी १०.०० वाजता कला, वाणिज्य आणि वि.कृ. कुलकर्णी विज्ञान महाविद्यालय, धडगांव येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, असे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त मंगेश वाघ यांनी एका शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे. जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, एकूण ६८० रिक्त पदे भरण्यात येणार आहेत.

# समाजकार्य महाविद्यालय चोपडा येथे क्रीडा महोत्सवाची उत्साहात सुरुवात

## खेळातून साधला जातो व्यक्तिमत्व विकास : अरुणभाई गुजराथी

प्रतिनिधी । चोपडा

**भगिनी मंडळ चोपडा शैक्षणिक संकुलातील समाजकार्य महाविद्यालय चोपडा च्या मैदानावर भव्य क्रीडा महोत्सवाची सुरुवात आज पासून झाली. या क्रीडा महोत्सवात भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलाच्या सर्व विभागातील विद्यार्थी सहभागी झाले होते.**



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेचे माजी अध्यक्ष अरुणभाई गुजराथी होते. प्रमुख अतिथी मान्यवर म्हणून प्रतिष्ठित उद्योगपती आशिष भाई गुजराथी, भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा पुनम गुजराथी, उपाध्यक्षा छाया गुजराथी, सहसचिव सौ अश्विनी गुजराथी, चोपडा तालुका क्रीडा समन्वयक राजेंद्र आल्हाट, ग.स. संचालक मंगेश भोईटे, चोपडा तालुका शासकीय क्रीडा समिती सदस्य अमोल पाटील, तालुका शासकीय क्रीडा समिती सदस्य ललित सोनवणे, विवेकानंद विद्यालयाचे विजय पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर सौदाणकर, उप प्राचार्य डॉ. आशिष गुजराथी, आदी मान्यवर विचारपीठावर हजर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकार्य महाविद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. मारोती गायकवाड यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी क्रीडा आयोजनाची पार्श्वभूमी आणि महत्व विशद केले. मंगेश भोईटे यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे आणि शारीरिक सुदृढतेचे महत्व पटवून दिले. महाराष्ट्र राज्याचे माजी विधानसभा अध्यक्ष अरुण भाई गुजराथी यांनी खेळामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होत असल्याचे नमूद करत प्रत्येक विद्यार्थ्याने दिवसातून एक तास तरी मैदानावर विविध खेळ खेळावेत असे आवाहन केले.

या क्रीडा महोत्सवात भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलातील सर्व विभागातून विविध खेळाडूंनी विविध खेळांमध्ये सहभाग नोंदविलेला आहे. हा क्रीडा महोत्सव दि.२१ जानेवारीपासून सुरू होऊन त्याची सांगता दिनांक २५ जानेवारी रोजी होणार आहे. यादरम्यान विविध प्रकारच्या खेळांच्या स्पर्धांचे आयोजन

- **क्रीडा महोत्सवात भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलातील सर्व विभागातून विविध खेळाडूंनी विविध खेळांमध्ये सहभाग नोंदविलेला असून विविध प्रकारच्या खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे.**

करण्यात आलेले आहे. क्रीडा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी भगिनी मंडळ शैक्षणिक संकुलातील सर्व विभाग प्रमुख, मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळत आहे. सर्व विभागातील क्रीडा शिक्षकांचे विशेष सहकार्य लाभत आहे. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ. राहुल निकम यांनी केले. क्रीडा महोत्सव करिता विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जळगावात १ फेब्रुवारीला पत्रकारांची 'वज्रमुठ'

## गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाची महत्त्वपूर्ण बैठक!

प्रतिनिधी । जळगाव

- **उत्तर महाराष्ट्रसह जिल्हा कार्यकारिणीची होणार निवड**

**पत्रकारांच्या हक्कासाठी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवणारी आक्रमक संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मगर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाफ्ची महत्त्वपूर्ण बैठक येत्या १ फेब्रुवारी २०२६ रोजी जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत संघटनेच्या उत्तर महाराष्ट्र व जिल्हाध्यक्षांसह जिल्हास्तरीय नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात येणार आहेत.**

ही महत्त्वाची बैठक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नरेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. ग्रामीण भागातील पत्रकारांची मवज्रमुठफ अधिक मजबूत करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी या बैठकीचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. बैठकीचा तपशील खालीलप्रमाणे : दि. १ फेब्रुवारी रविवार, वेळ : दुपारी १ वाजता, स्थळ: पद्मालय शासकीय विश्रामगृह (रेस्ट हाऊस), जळगाव. या बैठकीस केंद्रीय संस्थापक अध्यक्ष नरेंद्र कदम, केंद्रीय उपाध्यक्ष रविंद्र पवार, केंद्रीय सचिव भगवान सोनार, केंद्रीय खजिनदार ललित खरे, केंद्रीय सदस्य गणेश पाटील, सुनील चौधरी, जोशीला पगारिया आदी पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पत्रकारिता क्षेत्रातील वाढती आव्हाने आणि पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी संघटना सदैव तत्पर आहे. या बैठकीत केवळ नूतन कार्यकारिणीची निवडच होणार नाही, तर संघटनेच्या भविष्यातील कार्याची दिशाही निश्चित केली जाणार आहे. तरी जळगाव जिल्ह्यातील सर्व ग्रामीण व शहरी पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली एकजूट दाखवावी, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### डॉ. उल्हास पाटील इंग्लिश स्कूलमध्ये वसंत पंचमी साजरी

**भुसावळ ।** येथील डॉ. उल्हास पाटील सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वसंत पंचमी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी स्कूलच्या प्रिन्सिपल अनघा पाटील यांनी सरस्वती मातेचे पूजन केले. प्रसंगी प्रिंसीपल अनघा पाटील यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना वसंत पंचमी निमित्त मार्गदर्शन केले. यावेळी स्कुल मधील पंकजा कुलकर्णी, पूनम कुंडु, रुची जाधव, स्वप्नाली वैराळ यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन पूनम कुंडू यांनी तर आभार रूची जाधव यांनी मानले.

### मुक्ताईनगर नगराध्यक्ष चषक खामगावच्या गुलजमा संघाला

**मुक्ताईनगर ।** येथील नवनिर्वाचित नगराध्यक्षा संजना चंद्रकांत पाटील यांच्या गौरवार्थ मुक्ताईनगरला तीन दिवसीय नगराध्यक्ष चषक क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. अत्यंत अटीतटीच्या व चुरशीच्या झालेल्या सामन्यात खामगावच्या गुलजमा इलेव्हन संघाने नगराध्यक्ष चषक जिंकला. तर उपविजेता भुसावळचा स्वराज इलेव्हन संघ ठरला. देशभरातून विविध १६ क्रिकेट संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धेचे बक्षीस वितरण आमदार चिरंजीव हर्षल पाटील हस्ते करण्यात आले.

# धरणगावच्या ग्रामदैवत मरीआई मंदिर जीर्णोद्धारानिमित्त महाप्रसादाचे आयोजन

प्रतिनिधी । धरणगाव

**शहराचे ग्रामदैवत असलेल्या मरीआई मंदिराच्या जीर्णोद्धारानिमित्त मरीआई मंदिर संस्थान व जागृती युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य महाप्रसाद (भंडारा) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहराच्या पूर्व भागात वसलेले ब्रिटिश काळातील अत्यंत पुरातन मरीआई मंदिर अलीकडेच जीर्णोद्धारित करण्यात आले आहे.**



मंदिराच्या पवित्रतेसह ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी करण्यात आलेल्या या नूतनीकरणासाठी शहर व परिसरातील असंख्य दानशूर भाविक व नागरिकांनी उदार आर्थिक सहकार्य केले आहे. त्यांच्या सहकार्यामुळे नव्याने सुशोभित स्वरूपात मरीआई मंदिर उभे राहिले असून, त्या पार्श्वभूमीवर भाविकांसाठी महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मंगळवार, दि. २७ जाने, रोजी होणाऱ्या या महाप्रसाद कार्यक्रमासाठी सुमारे पंधरा हजार भाविकांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमात शहरातील सर्व समाजबांधव, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# धरणगावात सद्गुरु जोग महाराज पुण्यतिथीनिमित्त ३६ वा अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे आयोजन

प्रतिनिधी । धरणगाव

**स्वा. सुखनिवासी सद्गुरु जोग महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त धरणगाव येथील माऊली वारकरी शिक्षण संस्था येथे अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने त्रितपपूर्ती सोहळा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद् भागवत कथा तसेच सप्ताहाचे आयोजन श्री १००८ महंत हभप भगवानदासजी महाराज यांच्या मार्गदर्शनाने प्रतिवर्षाप्रमाणे संपन्न होत असून, हा आध्यात्मिक सोहळा यंदा सलग ३६ व्या वर्षात पदार्पण करत आहे.**



हा अखंड हरिनाम कीर्तन सप्ताह दि. २६ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत भक्तिभावात साजरा होणार आहे. सप्ताहादरम्यान महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार आपली कीर्तनसेवा सादर करणार असून, असंख्य वारकरी, कीर्तनकार व भाविकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभणार आहे. सप्ताहाच्या समारोपप्रसंगी सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत श्री. १००८ महामंडलेश्वर ह.भ.प. महंत अनंतदासजी महाराज कजवाडेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने या भक्तिमय सप्ताहाची सांगता होणार आहे. तसेच या सप्ताह दरम्यान रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भव्य दिंडी सोहळा व नगर प्रदक्षिणेचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिंडी सोहळ्यामुळे संपूर्ण धरणगाव नगरी ज्ञानोबा–तुकारामच्या जयघोषात आणि हरिनामाच्या गजरात भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे. या भव्य अखंड हरिनाम कीर्तन सप्ताहाचे संयोजक श्री. १००८ महामंडलेश्वर भगवानदाजी महाराज असून, पंचक्रोशीतील व परिसरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तन, कथा, नामस्मरण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पारोळा येथील हिमानी पिले 'भारत की झाकी' दिल्ली परेडमध्ये चमकणार!

प्रतिनिधी । पारोळा

**येथील पिले यांचे श्री पांडुरंग मंदिरातील संस्कृत शिक्षक, संस्कार पाठशाळेचे संस्थापक, भागवताचार्य ह. भ. प. स्व. रमेश अनंत पिले यांची नात, जळगाव येथील रावसाहेब रुपचंद विद्यालयातील संस्कृत शिक्षक संजय पिले यांची कन्या आणि दीपक पिले यांची पुतणी कु. हिमानी संजय पिले ही २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या दिल्ली येथील राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मान्यवरांच्या उपस्थितीत होणाऱ्या परेड मध्ये भारत की झांकी या अंतर्गत कथ्थक नृत्यात चमकणार आहे.**



कु. हिमानी ही वयाच्या सहाव्या वर्षापासून जळगाव येथील अपर्णा भट (कासार) यांचेकडे कथ्थक नृत्याचे शिक्षण घेत होती.

जळगाव येथे कथ्थक विशारद पूर्ण केल्यानंतर पुणे येथे शमा भाटे यांचे मार्गदर्शनात भारती विद्यापीठातून एम. ए. कथ्थक हे शिक्षण पूर्ण केले असून सध्या डॉ शमा भाटे यांच्या नादरूप नृत्यालयात कथ्थक नृत्याची सेवा करीत आहे.

आजपर्यंत हिमानीचे कथ्थक क्लासिकल नृत्याचे ओरिसातील कटक, अहमदाबाद, मुंबई, पुणे येथे अनेक कार्यक्रम झालेले आहेत.

दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात भारत की झांकी या प्रकारात कथ्थक नृत्याच्या सादरीकरणात संपूर्ण भारतातून सर्वोत्कृष्ट तीनशे विद्यार्थिनी सहभागी झाल्या असून त्यात प्रमुख नृत्यांगना म्हणून हिमानीची निवड झाली आहे ही आपल्या पारोळा आणि जळगाव वासियांसाठी अत्यंत अभिमानास्पद अशी बाब आहे. आपण सर्व प्रजासत्ताक दिनाच्या संचालनाचे अवलोकन करून कु. हिमानी चे कौतुक करून तिला प्रोत्साहित संपूर्ण पारोळा तालुका तसेच जळगाव जिल्ह्यातून अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# ट्रेसर्स असोसिएशन कृषी खाते महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी बारावे राज्यव्यापी अधिवेशन



प्रतिनिधी । चोपडा

**परभणी येथे बहुचर्चित खूप वर्षापासून प्रलंबित असलेले अनुरेखक बांधवांच्या सर्व प्रश्नांची सोडवणूक झाल्यानंतर अधिवेशनाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या अनुरेखकांच्या संघटनेने अखेर परभणी येथे ट्रेसर्स असोसिएशन कृषी खाते महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी बारावे राज्यव्यापी अधिवेशन संपन्न झाले.**

सदरील अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी दौलतराव चव्हाण, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी परभणी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीचे विद्यार्थी कल्याण संचालक डॉ.रावसाहेब राऊत, परभणीचे उप विभागीय कृषी अधिकारी पंडितराव बरदाळे तसेच जीनियस इंग्लिश स्कूल परभणीचे प्राचार्य काशिनाथ सालमोठे, ट्रेसर्स असोसिएशन कृषी विभाग महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष व्यंकटेश हालिंगे, सरचिटणीस जयप्रकाश कामडी, कोषाध्यक्ष विलास पोवार व मुख्य संयोजक अंबादास क्षीरसागर हे उपस्थित होते.

कार्यक्रमात सांगली येथील गायक अनुरेखक यांनी स्वागत गीत सादर केले व यांचे नंतर संघटनेचे कोषाध्यक्ष विलास पोवार कोल्हापूर यांनी महाराष्ट्र राज्य गीत सादर करीत सर्व प्रेक्षकांची, पाहुण्यांचे लक्ष आकर्षित केले. स्वागत गीतानंतर मंचावरील उपस्थित सर्व पाहुण्यांचा सत्कार संघटनेचे अध्यक्ष व्यंकटेश हालिंगे, मुख्य संयोजक अंबादास क्षीरसागर, संघटनेचे कोषाध्यक्ष विलास पोवार, सरचिटणीस जयप्रकाश कांमडी, संघटनेचे सहसंयोजक आर. आर बनपुरे, दुसरे सहसंयोजक नंदकुमार परांडकर परभणीचे जिल्हा अध्यक्ष हिरालाल बंडे, संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र चव्हाण, उपाध्यक्ष केशव मदनकर, उपाध्यक्ष यशवंत जडे, महिला प्रतिनिधी अश्विनी कोळेकर, विभागीय सचिव आर. एम. चव्हाण, विभागीय सचिव प्रकाश कडू, विभागीय सचिव सत्यजित कोमनाक, विभागीय सचिव किशोर शास्त्रकार, विभागीय सचिव किरण पाटील, इत्यादींनी पाहुण्यांचा, शॉल पुष्पहार श्रीफळ संघटनेचे स्मृतिचिन्ह देऊन यथोचित सत्कार सोहळा संपन्न केला.

अधिवेशनाचे आयोजन केल्याबाबत मुख्य संयोजक व अंबादास क्षीरसागर, हिरालाल बंडे, आर.आर. बनपुरे, नंदकुमार परांडकर, विलास पोवार, जयप्रकाश कांमडी, इत्यादींचा ही याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार सोहळा संपन्न करण्यात आला. अधिवेशनाच्या यशस्वीतेसाठी लातूर विभागाचे विभागीय सचिव नंदकुमार परांडकर, परभणी जिल्ह्याचे हिरालाल बंडे, परभणी जिल्हा संघटनेचे सदस्य सर्वश्री गजानन खपले, अविनाश कुरुडे,जगन्नाथ पवार, मोहीयोद्दीन,एस. एस.धर्मशेट्टी, नंदकुमार परांडकर, नारायण कदम, ईत्यादी अनुरेखक बांधवांनी अतिशय परिश्रम घेतले. सर्व उपस्थित पाहुण्यांचे प्रति अधिवेशन संयोजक अंबादास क्षीरसागर यांनी आभार प्रदर्शन केले व कार्यक्रम यशस्वी संपन्न झाल्याबद्दल सर्व उपस्थित सहकाऱ्यांचे आभार मानले.

# रासेयो शिबिरांतर्गत श्रमदानातून तापी नदी पात्राची स्वच्छता

## रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविकांचा उपक्रमात मोठा सहभाग

प्रतिनिधी । चोपडा

**येथील भगिनी मंडळ संचलित कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर दत्तक गाव निमगव्हाण (ता.चोपडा) येथे संपन्न होत आहे.**




या शिबिराच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून श्रमदानातून तापी नदी पात्राची स्वच्छता यशस्वीरीत्या पार पडली. या उपक्रमात रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

शिबिरादरम्यान सकाळी श्री.धुनिवाले दादाजी दरबारच्या पायथ्याशी एकत्र येऊन स्वयंसेवकांनी नदीपात्र व परिसरात साचलेला प्लास्टिक कचरा, पिशव्या, कागद, फोटो फ्रेम, बाटल्या, निर्माल्य व इतर घनकचरा गोळा करून त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट लावली. या श्रमदानामुळे नदी पात्र स्वच्छ व सुंदर झाले असून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजात पोहोचला. यावेळी प्रमुख कार्यक्रम अधिकारी सहा.प्रा.अनिल बाविस्कर यांनी नदी प्रदूषणामुळे होणारे दुष्परिणाम, जलसंधारणाचे महत्त्व तसेच स्वच्छतेबाबत प्रत्येक नागरिकाची जबाबदारी याविषयी मार्गदर्शन करून स्वच्छ नदी म्हणजे निरोगी पर्यावरण आणि भावी पिढीसाठी सुरक्षित जलस्रोत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी स्वागत केले असून रासेयो स्वयंसेवकांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

सदरील उपक्रमात रासेयो प्रमुख कार्यक्रम अधिकारी सहा.प्रा.अनिल बाविस्कर, महिला कार्यक्रम अधिकारी सहा.प्रा.मोहिनी पाटील आदींसह रासेयो स्वयंसेवक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.